पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- २०१८-२०१९

# महिला सबलीकरण समिती

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## वार्षिक अहवाल : २०१८-२०१९

## महिला सबलीकरण समिती

महिला सबलीकरण समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

### ❖ महिला आरोग्य तपासणी शिबीर :-

महाविद्यालयातील मुलींमध्ये स्वत:च्या आरोग्याविषयी जाणिव जागृती व्हावी म्हणून दि. २१ ऑगस्ट २०१८ रोजी महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य तपासणीसाठी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. निती म्हस्के व नेत्रतज्ञ डॉ. भाले हे आले होते. शिबीर उद्घाटन कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. शिबिराच्या उद्घाटनानंतर डॉ. निती म्हस्के मॅडम यांनी मुलींची आरोग्य तपासणी केली. तपासणीनंतर मुलींना कोणता पोषक आहार घ्यावा आणि आरोग्याची काळजी कशी घ्यावी, यासंबंधी मार्गदर्शन केले. डॉ. भाले यांनी मुलींच्या डोळ्यांची तपासणी केली व तसेच मुलींना डोळ्यांची काळजी कशी घ्यावी यासंबंधी मार्गदर्शन केले. सदरील आरोग्य तपासणी शिबिरात ५० विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

### ❖ राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती :-

राष्ट्रमाता जिजाऊ व क्रातीज्योती सावित्रीबाई फुले या दोन्ही जयंतीचे औचित्य साधून दि. ०३ जानेवारी २०१९ रोजी “Gender Sensatization Programme” अंतर्गत Gender Equality (लिंगभाव समानता) या विषयावर तज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी डॉ. महानंदा दळवी (इंग्रजी विभाग प्रमुख, डॉ. ई.भा.पाठक महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद) यांना आमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. महानंदा दळवी यांनी असे मत व्यक्त केले की, स्त्रीयांनी शिक्षणातून व आर्थिक स्वावलंबनातून पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा मिळविला पाहिजे.

पुरूषांनीही आपल्या कुटुंबातील स्त्रीयांना समानतेचा दर्जा व विकासाची समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भुषविले.

### ❖ निबंध लेखन स्पर्धा :-

राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त दि. ०५ जानेवारी २०१९ रोजी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ‘‘स्त्री-पुरुष समानता’’ या विषयावर ही निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली होती. सदरील स्पर्धेत १२ विद्यार्थीनींनी भाग घेतला होता. ज्यापैकी कु. अंकिता अशोक गायके हीने प्रथम तर कु. मीरा गाडेकर हीने द्वितीय क्रमांक मिळविला होता.

### ❖ जागतिक महिला दिन – ०८ मार्च २०१९ :-

जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ०८ मार्च २०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी उत्स्फूत वर्क्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत महिला संबंधीचे विषय देऊन ही स्पर्धा घेण्यात आली. सदरील स्पर्धेत मृणाली मनोरकर, अंकिता गायके व माधुरी महाले यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

# महिला सबलीकरण समिती

## शैक्षणिक वर्ष : २०१८-१९

## कार्यक्रमाची छायाचित्रे

### महिला आरोग्य तपासणी शिबीर




दि. २१ ऑगस्ट २०१८ रोजी महिला आरोग्य तपासणी शिबिरात फुलंब्री प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. निती म्हस्के मॅडम मुलींची तपासणी करतांना



दि. २१ ऑगस्ट २०१८ रोजी महिला आरोग्य तपासणी शिबिरात फुलंब्री प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. भाले सर मुलींच्या डोळ्यांची तपासणी करतांना

# राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्यांती सावित्रीबाई फुले या दोन्ही जयंतीचे दि. ०३ जानेवारी २०१९ रोजी प्रतिमा पूजन करतांना डॉ. महानंदा दळवी, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व विद्यार्थी-विद्यार्थीनी



"Gender Sensatization Programme" अंतर्गत Gender Equality (लिंगभाव समानता ) या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. महानंदा दळवी मॅडम

# निबंध लेखन स्पर्धा



राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्यांती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त आयोजित निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी

# जागतिक महिला दिनानिमित्त उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा









दि. ०८ मार्च २०१९ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या उत्स्फूत वक्तृत स्पर्धेत सहभागी स्पर्धक व स्पर्धकांना मार्गदर्शन करतांना डॉ. अश्विन रांजणीकर